# आवडीचे गाणे

**डॉ. भाग्यश्री कुलकर्णी**

**ॐ पब्लिकेशन्स्**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**आवडीचे गाणे : Aavdiche Gane**
डॉ. भाग्यश्री कुलकर्णी

**© डॉ. भाग्यश्री कुलकर्णी**

'वरदा' प्लॉट क्र. १३, नाळे कॉलनी
आय.टी.आय.जवळ, कळंबा रोड, कोल्हापूर.

**प्रकाशक**
ॐ पब्लिकेशन्स्
६७८, सृष्टी विष्टा, निदान समोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स

**आवृत्ती**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत**
रुपये २००/-

# मनोगत आणि ऋणनिर्देश...

प्रा. चंद्रकुमार नलगे सर यांनी माझे 'आवडीचे गाणे' हे सदर दै. महासत्तामधून गेले काही वर्षे सातत्याने प्रसिद्ध केले आहे. या सदरातील विस्मृतीत गेलेली जुनी-नवी मराठी गीते वाचकांच्यासमोर पुस्तकरूपाने ठेवावीत हा प्रा. नलगे सरांचाच आग्रह असल्याने केवळ त्यांच्याच प्रोत्साहनाने संगीतप्रिय वाचकांच्या हाती हे पुस्तक देता आले याचा अतिशय आनंद होत आहे आणि याचे सारे श्रेय प्रा. चंद्रकुमार नलगे सरांनाच द्यावे लागेल.

श्री. शितल मेहता यांनी प्रा. नलगे सर यांचे स्वप्न सत्यात आणले याबद्दल त्यांचे मी मनापासून आभार मानते.

मराठी आपली मातृभाषा असली तरीही गाण्यातील शब्दांचे अर्थ त्यातील भाव-भावनांसहित प्रत्येक संगीतप्रिय व्यक्तीला उमगतातच असे नाही. 'शब्दांवाचूनी कळले सारे शब्दांच्या पलीकडचे' हे प्रेमात जरी शक्य असले, तरी शब्दांतील अर्थ कळला नाही तर 'अर्थावाचूनी व्यर्थ सारे गीतांमधील शब्दांचे' असे म्हणावे लागते. मराठीतील उपलब्ध झालेल्या जुन्या आणि प्रसिद्ध गीतांची मी संग्रहक असून शक्य तितक्या साध्या-सोप्या भाषेत गाण्यातील शब्दांचे अर्थ मला जमेल तसे मी देण्याचा प्रयत्न केलेला आहे. गीतांमधील किंवा कवितांमधील अर्थ हे व्यक्तिसापेक्ष असू शकतात. कवीच्या मनात त्याच्या गीताचा किंवा कवितेचा अर्थ वेगळा असू शकतो. मला जो अर्थ भावला तोच अर्थ कवीला किंवा अन्य रसिकांना अभिप्रेत असेल

असे नाही. गीत संग्रहक आणि भावार्थ लेखन एवढीच भूमिका मी पार पाडलेली आहे. त्याचबरोबर शक्य असेल तिथे मी गीतकार, संगीतकार, चित्रपटाचे नाव इत्यादीचा नामोल्लेख केलेला आहे. गीतकार, संगीतकार आणि गायक–गायिका यांच्या योगदानामुळेच मी हे सदर लिहू शकले त्यामुळे या सर्वांचे आभार मानणे मी माझं कर्तव्य समजते.

जे काही चांगलं असेल त्याचं श्रेय त्या थोर व्यक्तींनाच आहे. या पुस्तकास प्रत्यक्ष–अप्रत्यक्षपणे सहकार्य करणाऱ्या साऱ्यांचे आणि अक्षरजुळणी करणारे रावजी देसाई यांचे मी मनापासून आभार मानते. काही त्रुटी–उणिवा राहिल्या असतील तर तो दोष माझा असेल.

**डॉ. भाग्यश्री कुलकर्णी**

# प्रस्तावना

आजची नव्या पिढीची कविता अनेक वाटा वळणे घेत निघालेली आपल्याला दिसते. १८७५ च्या दरम्यान विष्णुशास्त्री चिपळूणकरांची ‘निबंधमाला’ सुरू झाली आणि मराठी गद्याची उत्क्रांती नेट धरू लागली. त्याही आधी म.फुले यांच्या लिखाणाने वेगळे पर्व निर्माण झाले होते. १८८५ नंतर नव्या युगाची द्वाही केशवसुतांनी तुतारी फुंकून केली होती. त्यांचे नवा मनू घडविण्याचे काम काव्यप्रांतात सुरू झाले होते. याच दरम्यान नाट्यमन्वंतर घडले. एकूणच साहित्य विश्व वेगळे अपरुप दाखवत निर्माण होऊ लागले.

याही आधी संतश्रेष्ठांनी, पंडितांनी आणि शाहिरांनी, तसेच महानुभाव पंथियांनी मराठी भाषा आणि साहित्य समृद्ध केले होते.

आधुनिक मराठी गद्याच्या इंग्रजी अवताराची धुम संपल्यानंतर अर्वाचीन मराठी साहित्याला नवे धुमारे आले. कथा, कादंबरी, नाटक, काव्य यांच्या नवनिर्माणाला बहर आला, अनेक थोर कवी-साहित्यिकांनी आपापल्या मुद्रा या साहित्यांवर उमटवल्या आहेत. अनेक कलाक्षेत्रात नाविन्याची बाजी सुरू झाली.

नाट्यकलेला बहर येत असतानाच चित्रपट संदर्भातील मूकपट सुरू झाले. चित्रपटांनी ‘मूक’पणा सोडला आणि बोलपट सुरू झाले. त्यांनी लोकमनाची पकड घेतली. चित्रगीतांचा आगळा कालखंड सुरू झाला. अनेक प्रथितयश, नामवंत कवींनी चित्रपटांसाठी अत्यंत भावपूर्ण, प्रासादिक चित्रपटगीते लिहिली. अशा भावपूर्ण गीतांनी रसिक प्रेक्षकांवर प्रभाव गाजवला. लोकांच्या काळजाशी जाऊन भिडली. लोक मनस्वीपणे ती गाणी गुणगुणू लागली.

अशा गीतांचा एक जमाना होता. या चित्रपटगीतांवर कित्येक पिढ्या पोसल्या आहेत. उत्तम कवींच्या अभ्यासक्रमाच्या पुस्तकांतून अभ्यासलेल्या कविता कित्येक पिढ्या समाजमनाला उल्हसित करीत राहिल्या. श्रोत्यांची मने जिंकत अंतर्मनात रुजत राहिल्या, गुंजत राहिल्या, चित्राचा ठाव घेत आठवत राहिल्या.

अशा आवडीच्या गाण्यांचं हे अत्यंत सुंदर, सरस, मनोरम असं हे वेगळं दर्शन आहे. या चित्रपटगीतांवर, भक्तीगीतांवर, भावगीतांवर अत्यंत मोहक असं भावभाष्य लेखिका-भाष्यकार डॉ. भाग्यश्री कुलकर्णी यांनी मनापासून आवडीने केले आहे. अशी जुनी लोकप्रिय गाणी, कविता असतील तर त्यांना खूप आवडतात. त्या गाण्यांचा भावार्थ हा संस्कारशील म्हणून ती जुनी गाणी त्यांना जवळची वाटतात, भावतात.

अशी गाणी कळायला, समजायला सोपी असतात. त्यातील भाव उदात्त असतात. अशा या भावविश्वात डॉ. कुलकर्णी यांचे व्यक्तिमत्व घडल्याचे जाणवते. या गाण्यांतील, कवितांतील त्यांना उमजलेला, त्यांच्या विकास मनाची पकड घेणारा भाव उलगडून दाखवायला त्यांना मनस्वी आनंद होताना दिसतो.

या जुन्या गाण्यांनी-कवितांनी एकेकाळची पिढी मोहरून गेली. त्यानंतरच्याही पिढ्या श्रवणमाधुर्याने 'आनंदाचे डोही आनंद तरंग' मानून गेल्या. ती गाणी आजही ऐकली, वाचली, कानावरून गेली तरी जगण्यातील आनंद वाढत राहताना दिसतो. आमची पिढी या गाण्यांवर डोलली, झुलली आणि फुललीही. या गाण्यांचा रसास्वाद घेणं म्हणजे आपल्या रंध्रारंध्रात एक धुंदी चढवून घेणं अशी मनोवस्था असायची.

ही गाणी सुबोध होतीच, शिवाय प्रासादिक होती. एक वेगळ्या प्रकारची त्यात लयही होती. त्यांचा भावार्थ सुगम होताच, शिवाय संगीतही सुगम होते. ते कोवळ्या हळव्या मनाला मोहवून टाकीच, पण वयस्करांनाही मनमुराद आनंदात न्हाऊन निघण्याची संधी देई. अजूनही तीच अवस्था आहे. हे गीत-कविता आठवली तरी आवडीने झपाटून टाकणारी एक धुंदी, एक कैफ अनुभवायला मिळतो.

त्या गाण्यांच्या केवळ स्मरणानेही आपले निरागस, निष्पाप, लोभस मन हरवून जाते. जुन्या काळात रमते. हे रमणे आपल्या चेतापेशींना नवे संजीवन देणारे ठरते.

डॉ. भाग्यश्री कुलकर्णी यांनी महत्प्रयासाने ही गाणी–कविता कष्टपूर्वक जमविली आहेत. त्यांची ही धडपड कौतुकास्पद आहे. या संग्रहातील सर्व गाण्यातील जीवनानंद उलगडून दाखविण्यात त्या रमून गेलेल्या दिसतात.

ही कल्पना ज्यावेळी डॉ. कुलकर्णी यांनी मला सांगितली, तेव्हा मला खूप आनंद झाला. मी त्यांना विनंती केली की, त्यांनी हे गाण्यांचे भावभाष्य दै. महासत्ताच्या रविवार पुरवणीत प्रसिद्ध करण्यासाठी द्यावे. त्यांनी विनंती मान्य केली. गेले काही वर्षे 'आवडीचे गाणे' ही मालिका चालू राहिली आणि अजूनही ती चालू आहे. लोकांना ही मालिका फारच आवडली. एका विशिष्ट काळाच्या स्थितीत मरगळलेल्या मनाचा आनंद द्विगुणित करणारी ठरली. डॉ. भाग्यश्री कुलकर्णी यांनी केलेले हे भावभाष्य आपल्याशी वेगळा अनुबंध निर्माण करून जाते. हे पुस्तक सर्वांना जरूर आवडेल.

अशी कौटुंबिक जिव्हाळ्याची, भावकोमल आशयाची, समाजमनाला रुंजी घालणारी, मन:कोष संवेदनशीलतेने समृद्ध करणारी, वेड लावणारी, लोकजीवन निकोप ठेवणारी, प्रेमरंगातही रंगून जाणारी गाणी डॉ. कुलकर्णी यांच्या भावभाष्याने व भावार्थाने अधिक भावून जातात. जगण्याला बळ देतात. लेखिकेच्या घरातच आईच्या रूपाने संगीताचा वारसा असल्याने हे भावार्थ अधिकच देखणे झाले आहेत. भावी वाटचालीस शुभेच्छाऽऽ...

**– प्रा. चंद्रकुमार नलगे**

# अनुक्रमणिका


- जय शारदे वागेश्वरी ... १७
- घन: श्याम सुंदरा... ... १९
- ही वाट दूर जाते ... २२
- आज कुणीतरी यावे ... २४
- कल्पनेचा कुंचला ... २७
- आवडसी तू... ... २९
- त्या सावळ्या तनूचे... ... ३१
- जुळत आली कथा ... ३३
- डोळ्यात वाच माझ्या... ... ३५
- लपविलास तू हिरवा चाफा ... ३७
- रानात सांग कानात... ... ३९
- डुले डुले डुले डुले... ... ४१
- हवास तू... ... ४३
- सांग तू माझा होशील का? ... ४५
- आला वसंत देही ... ४७
- चांदणे फुलले माझ्या मनी ... ४९
- सहज सख्या एकटाच... ... ५१

| | | |
|---|---|---|
| ❍ राधिका चतुर बोले | ... | ५३ |
| ❍ आली ठुमकत, मान मुरडत... | ... | ५५ |
| ❍ सावध हरिणी सावध गं | ... | ५८ |
| ❍ मोठं मोठं डोळं... | ... | ६० |
| ❍ हा रुसवा सोड... | ... | ६२ |
| ❍ डाव मांडून भांडून... | ... | ६५ |
| ❍ जे वेड मजला लागले | ... | ६८ |
| ❍ धुंद आज डोळे... | ... | ७० |
| ❍ कुणी म्हणेल वेडा... | ... | ७२ |
| ❍ तुझ्या पंखावरूनी... | ... | ७४ |
| ❍ प्रतिमा उरी धरोनी... | ... | ७६ |
| ❍ जीवनात ही घडी... | ... | ७९ |
| ❍ गर्द सभोवती... | ... | ८२ |
| ❍ या कातरवेळी... | ... | ८४ |
| ❍ चांदण्या रात्रीतले ते... | ... | ८६ |
| ❍ जा रे चंद्रा तुडवित... | ... | ८९ |
| ❍ रिमझिम झरती... | ... | ९१ |
| ❍ ऐकशील का माझे... | ... | ९४ |
| ❍ जिवलगा कधी रे... | ... | ९६ |
| ❍ हासत वसंत ये वनी | ... | ९८ |
| ❍ चला सख्यांनो हलक्या... | ... | १०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ❍ | पाहुनी रघुनंदन सावळा | ... | १०२ |
| ❍ | गळ्यात माझ्या तूच... | ... | १०४ |
| ❍ | ओटी आईची मोत्यानं | ... | १०६ |
| ❍ | हे चिंचेचे झाड... | ... | १०८ |
| ❍ | येणार नाथ आता... | ... | ११० |
| ❍ | अरे संसार संसार... | ... | ११२ |
| ❍ | गोमू माहेरला जाते... | ... | ११५ |
| ❍ | कुणीही पाय नका... | ... | ११८ |
| ❍ | निजल्या तान्ह्यावरी... | ... | १२० |
| ❍ | देव जरी मज... | ... | १२३ |
| ❍ | घरात हसरे तारे... | ... | १२५ |
| ❍ | आवडती भारी मला... | ... | १२७ |
| ❍ | पाऊस पडतो भुरुभुरू | ... | १२९ |
| ❍ | नको ताई रुसू... | ... | १३१ |
| ❍ | पदरावरती जरतारीचा... | ... | १३३ |
| ❍ | कोण येणार गं पाहुणे | ... | १३५ |
| ❍ | गंगा यमुना डोळ्यांत... | ... | १३७ |
| ❍ | रुणझुणत्या पाखरा | ... | १३९ |
| ❍ | आला आला वारा... | ... | १४१ |
| ❍ | मला आवडे माझे... | ... | १४३ |
| ❍ | खेड्यामधले घर कौलारू | ... | १४५ |